अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या पुनर्रचनेसंदर्भात
गठीत समितीस मुदतवाढ देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक: संकीर्ण-१०१५/ प्र.क्र.२२९/का.१४२६,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १२ ऑक्टोबर, २०१७

वाचा :- नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-१०१५/ प्र.क्र.२२९/का.१४२६, दि.१९/०७/२०१७

शासन निर्णय

अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या पुनर्रचनेसंदर्भात अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली संदर्भाधीन दि.१९/०७/२०१७ च्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयात नमूद केल्यानुसार, या समितीने त्यांचा अंतिम अहवाल आदेशाच्या दिनांकापासून दोन महिन्यांत सादर करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. सदर समितीची मुदत दि.१९/०९/२०१७ रोजी संपुष्टात आली आहे.

२. आता, सदर समितीस त्यांचा अंतिम अहवाल सादर करण्यासाठी दि.३१/१२/२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७१०१२१३२०५६५७१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्रचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Priyanka Ranjan Chhapwale

Digitally signed by Priyanka Ranjan Chhapwale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2295c5c50b6a2aa03b2654fd2f5f69a709a20ae44359c483f3e1b0d4450728d0, cn=Priyanka Ranjan Chhapwale
Date: 2017.10.13 16:10:41 +05'30'

(प्रियांका छापवाले)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. मंत्री/राज्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई..
३) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
४) अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

५) प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

६) प्रधान सचिव (साविस), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

७) प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.

८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.

९) महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.

१०) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णय, अध्यक्ष, राजपत्रित/अराजपत्रित अधिकारी/कर्मचारी संघटना, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावा.

११) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / लेखा कोष भवन, बांद्रा (पूर्व), मुंबई.

१२) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.

१३) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई.

१४) कार्यासन अधिकारी, वित्त विभाग (व्यय-८/ वित्तीय सुधारणा-१), मंत्रालय, मुंबई.

१५) कार्यासन अधिकारी (का-१४२७), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.

१६) निवडनस्ती- (कार्यासन-१४२६)